
23-02-2025-Dai-04_DH_PAN_20_08_2016-3.qxp 02/22/2025 11:27 PM Page 1



## निवडक

### लाडफे येथे उद्या 'गर्जले सह्याद्रीचे कडे'

■ टीम दैनिक हेराल्ड



**साळ, दि. २२ :** लाटंबार्से पंचायत क्षेत्रातील लाडफे येथील श्री महादेव देवाच्या उत्सवा प्रित्यर्थ सोमवार दि २४ रोजी संध्याकाळी ७ वाजता श्री महादेव मंदिर सभामंडपात श्री सातेरी स्वर – श्रृंगार संगीत विद्यालय – लाडफेतर्फे महादेव गवस लिखित विष्णू मळीक दिग्दर्शीत तीन अंकी ऐतिहासिक संगीत नाटक 'गर्जले सह्याद्रीचे कडे' सादर करण्यात येणार आहे. या नाट्यप्रयोगात बाबलो कळंगुटकर, प्रमोद मळीक, नंदा माजीक, प्रणय मळीक, सुरज मळीक, विभव धुरी, पांडुरंग मोरे, आत्माराम मळीक, रुपेश माजिक, सगुण धुरी, महादेव गाड्डी, दुबा मळीक, साईश मळीक, गौरेश धुरी, संतोषी परब, समिर मळीक, रघुनाथ मळीक, अमोघ मळीक, अंश मळीक आदी कलाकार सहभागी होणार आहेत. श्री सातेरी केळबाय देवस्थान व ग्रामस्थ, लाडफे यांचे आयोजन व व्यवस्थापन आहे.



**म्हापसा : आमोणकर विद्यामंदिरात शिव जयंती साजरी करताना आठवीचे विद्यार्थी.**

### आमोणकर विद्यामंदिरात शिव जयंती उत्साहात

■ टीम दैनिक हेराल्ड

**म्हापसा, दि. २२ :** जी. एस. आमोणकर विद्यामंदिराच्या सभागृहात सकाळी आठ वाजता आठवीच्या विद्यार्थ्यांव्दारे शिवजयंतीचा कार्यक्रम पार पाडला. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या फोटोला पुष्पहार घालून झाली. शिक्षक महेंद्र बिल्गोजी व विद्यार्थी सार्थक जाधव यांची समर्पक भाषणे झाली. सकाळी विद्यार्थिनी वेदिका सालेलकर हिने कविता सादर केली.

विद्यार्थी सर्वेश साळगांवकर याने छत्रपती शिवाजी महाराजांवर मनोगत प्रस्तुत केले. तद्नंतर विद्यार्थ्यांचे नृत्य व संगीत नाट्य झाले. विद्यार्थिनी शामिका चिपकर हिने पावडा प्रस्तुत केला. तद्नंतर शिवजयंती निमित्त घेतलेल्या प्रश्नमंजुषा स्पर्धेच्या विजेत्यांना बक्षिसे देण्यात आली. कार्यक्रमात शाळेच्या मुख्याध्यापिका पूजा दळवी उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सात्विक भोमकर व इशीका शिरोडकर या विद्यार्थ्यांनी केले.

### दहावी पैंगीण केंद्राची आसन व्यवस्था

■ टीम दैनिक हेराल्ड

**आगोंद, दि. २२ :** गोवा शालान्त मंडळाच्या दहावीची अंतिम परीक्षा १ मार्च २५ पासून सुरू होत असून शेवटचा पेपर २१ मार्चला होईल. गोवा शालान्त मंडळाच्या वतीने दहावी परीक्षेसाठी पैंगीण (३३–एस) केंद्राची आसन व्यवस्था जाहीर करण्यात आली आहे. पैंगीण (३३–एस)येथे केंद्र प्रमुख स्वाती खोलकर तर निरीक्षक म्हणून हेमंत कामत तर उपप्रमुख म्हणून पुरुषोत्तम लोलयेंकर व संकेत वारीक यांची निवड केली आहे. पैंगीण येथील श्रद्धानंद हायस्कुल मुख्य केंद्रात २७६४४ ते २७६५१ व २७७५२ ते २७८८६ या क्रमांकाची आसन व्यवस्था करण्यात आली आहे. १४३ विद्यार्थी या ठिकाणी परीक्षा देणार आहेत. या केंद्रात श्री दामोदर विद्यालय – लोलयें, सेंट सेबस्त्यान हायस्कूल, निराकार विद्यालय, श्री श्रद्धानंद विद्यालय, सेंट एन्थोनी हायस्कूल, श्री बलराम निवासी विद्यालय, या शाळांच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे. तर दापोट येथील एस.एस. आंगले उच्च माध्यमिक विद्यालय या उपकेंद्रात २७६५२ते २७७५१ या क्रमांकाची आसन व्यवस्था करण्यात आली आहे. या उपकेंद्रात एकूण १०० विद्यार्थ्यांचा समावेश आहे. यामध्ये श्री दामोदर विद्यालय, श्री श्रद्धानंद विद्यालय, श्री निराकार विद्यालय, सेंट सेबस्त्यान हायस्कूल व सेंट एन्थोनी हायस्कूल या शाळांच्या विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

### केरी न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये शिवजयंती उत्साहात साजरी

■ टीम दैनिक हेराल्ड

**हरमल, दि. २२ :** केरी येथील न्यू इंग्लिश हायस्कूलमध्ये शिवजयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात झाला. या कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यालयाचे मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर, ज्येष्ठ शिक्षक सर्वेश कोरगावकर, गुरुप्रसाद तांडेल, शिक्षिका शर्मिला नाईक, तसेच जिओ – हिस् क्लबच्या इन्चार्ज शिक्षिका नीलम महालदार उपस्थित होते. महाराजांच्या प्रतिमेला वंदन करत उपस्थितांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला. यानंतर, इयत्ता नव्वीतील विद्यार्थिनी वैष्णवी राणे हिने प्रभावी भाषणाद्वारे छत्रपती शिवाजी महाराजांचे पराक्रम, दूरदृष्टी आणि शौर्य यावर प्रकाश टाकला.त्यानंतर सानवी काळोजी (इयत्ता सहावी) हिने हिरकणीची कहाणी सादर केली. तिच्या सादरीकरणाने उपस्थित श्रोत्यांना हिरकणीच्या धैर्याचे स्मरण करून दिले.

कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे इयत्ता आठवीच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेला जोशपूर्ण पोवाडा आणि नाटक. त्यांच्या प्रभावी सादरीकरणात शिवकाल पुन्हा जिवंत झाल्यासारखे वाटले. पोवाड्याच्या तालावर संपूर्ण सभागृह भारावून गेले आणि विद्यार्थ्यांनी शिवरायांचा इतिहास मनात ठसवला. शाळेचे मुख्याध्यापक भावार्थ मांद्रेकर यांनी आपल्या प्रेरणादायी भाषणातून शिवाजी महाराजांचे नेतृत्व, त्यांची स्वराज्य स्थापनेसाठीची जिद्द आणि आजच्या पिढीने त्यांच्याकडून काय शिकावे यावर भर दिला. त्यांनी विद्यार्थ्यांना शिवरायांच्या आदर्शांवर चालण्याचे मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम उत्कृष्टरित्या यशस्वी करण्यासाठी शिक्षिका तनवी चोडणकर व संजना मोरजकर आणि इतर शिक्षकांनी योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी शंकर पेडणेकर ह्याने उत्स्फूर्तपणे पार पाडले, तर शिक्षिका मिताली हरमलकर हिने आभार प्रदर्शन केले. यावेळी पालकांनी संपूर्ण कार्यक्रम अत्यंत प्रेरणादायी आणि उत्साहवर्धक होता, अशा प्रतिक्रया दिल्या.

### दोडामार्ग येथे आजपासून श्रीमद् भागवत कथाचे आयोजन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २२ :** दोडामार्ग येथील श्री राष्ट्रोळी दत्त मंदिर – सावंतवाडा येथे रविवार दि. २३ फेब्रुवारी ते रविवार दि. २ मार्च पर्यंत श्रीमद् भागवत कथा चे आयोजन करण्यात आले आहे.

रविवार दि. २३ रोजी सकाळी ९ वाजता देवता स्थापना व संहिता वाचन, संध्याकाळी ५ वाजता श्रीमद् भागवत ग्रंथ दिंडी होईल.

सोमवार दि. २४ फेब्रुवारी ते रविवार दि. २ मार्च २०२५ पर्यंत रोज सकाळी देवता पूजन व संहिता वाचन, संध्याकाळी ६.३० ते रात्री ९.३० वाजता श्रीमद् भागवत कथा, रात्री ९.३० वाजता आरती व तीर्थप्रसाद, रात्री ९.५० वाजता महाप्रसाद तसेच श्री वेदमूर्ती सचिन भाटवडेकर गुरुजी यांचे रोज प्रवचन असणार आहे .

श्री गुरुचरित्र सेवा – दोडामार्ग , वासुदेवानंद सरस्वती प्रतिष्ठान – दोडामार्ग , दीपस्तंभ फाऊंडेशन – साटेली भेडशी हे आयोजक तर श्री राष्ट्रोळी दत्तकृपा मंडळ – सावंतवाडा, दोडामार्ग हे व्यवस्थापक आहेत. तरी आपण सर्व भक्तांनी रोज उपस्थित राहून याचा लाभ घ्यावा, असे कळविण्यात आले आहे.

# भारत पाकिस्तानमध्ये आज 'महामुकाबला'

## रोहित सेना दुसऱ्या विजयासाठी सज्ज | पाकसाठी 'करो या मरो'

**दुबई, दि. २२ :**



पाकिस्तानमध्ये सुरूअसलेल्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चा चौथा सामना उद्या रविवारी दुपारी २ वाजता दुबईतील आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळवला जाणार आहे. यामध्ये भारत आणि पाकिस्तान हे कट्टर प्रतिस्पर्धी आमने–सामने येणार आहेत. या सामन्याकडे आशिया खंडातील तसेच संपूर्ण जगाचे लक्ष लागून राहिले आहे. यासोबतच पाकिस्तानला पहिल्या सामन्यात न्यूझीलंड विरुद्ध ६० धावांनी पराभव पत्करावा लागला. तर टीम इंडियाने पहिल्या सामन्यात बांगलादेशला ६ विकेट्सने हरवले होते. यामुळे पाकिस्तानसाठी हा सामना 'करो या मरो' असा असेल. जर रिझवानच्या नेतृत्वाखालील पाकिस्तानने भारताविरुद्धचा सामना गमावला तर त्याच्यासाठी उपांत्य फेरीचे दरवाजे जवळजवळ बंद होणार आहेत.

विराट कोहली आणि रोहित शर्मा खेळत नसतानाही टीम इंडिया प्रतिस्पर्ध्यांचा सहज पराभव करत आहे. कर्णधार रोहित शर्माचा फॉर्म भारतासाठी चिंतेचा विषय होता, परंतु बांगलादेशविरुद्ध त्याने ज्या पद्धतीने फलंदाजी केली त्यावरून असे दिसून येते की सलामीवीराला त्याची लय सापडली आहे. त्याने ४१ धावांची तुफानी खेळी खेळून भारताला चांगली सुरुवात करून दिली.भारतासाठी सर्वात मोठी चिंतेची बाब म्हणजे विराट कोहलीची चांगली सुरुवात मोठ्या धावसंख्येमध्ये रूपांतरित करण्यात असमर्थता. आता काही काळापासून तो पूर्वीसारखी एकाग्रता दाखवत नसल्याने पाकिस्तानविरुद्ध मोठी खेळी खेळण्यासाठी त्याला अतिरिक्त प्रयत्न करावे लागणार आहेत. मात्र, सलामीवीर शुभमन गिलचा उत्कृष्ट फॉर्म भारतासाठी चांगलाच संकेत आहे. बांगलादेशविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात त्याने शतक झळकावले होते त्यामुळे भारताला २२९ धावांचे लक्ष्य सहज गाठता आले होते. शेवटचा सामना जिंकणाऱ्या भारतीय संघात कोणताही बदल होण्याची शक्यता नाही. खेळपट्टी फिरकी गोलंदाजांना मदत करेल अशी अपेक्षा आहे आणि अशा परिस्थितीत कुलदीप यादव, रवींद्र जडेजा आणि अक्षर पटेल प्लेइंग इलेव्हनमध्ये राहणे निश्चित आहे.दुसरीकडे, वरुण चक्रवर्तीला पाकिस्तानविरुद्ध खेळण्याची संधी मिळेल, अशी आशा कमी आहे. वरुणला घेण्याचा विचार केल्यास कुलदीपच्या जागी त्याला संधी मिळू शकते. संघ व्यवस्थापन कुलदीपला बाहेर ठेवेल अशी शक्यता कमी आहे.

दुसरीकडे, पहिल्या सामन्यात न्यूझीलंडकडून पराभवाचा सामना करावा लागल्याने पाकिस्तानला उद्याचा सामना कोणत्याही परिस्थितीत जिंकावाच लागणार आहे. त्यामुळे रिझवान विजयाच्या इराद्यानेच मैदानात उतरेल. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये दोन्ही संघांमधील शेवटचा सामना २०१७ मध्ये फायनलमध्ये झाला होता ज्यामध्ये पाकिस्तानचा संघ जिंकला होता. पाकिस्तानचा कर्णधार मोहम्मद रिझवान आणि त्याचे सहकारी लंडनमधील त्या विजयापासून प्रेरणा घेण्याचा प्रयत्न करतील पण त्यांच्या खेळाडूंना खेळाच्या तिन्ही विभागात चांगली कामगिरी करावी लागेल. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील या सामन्याची पूर्वीइतकी चर्चा होत नाही, त्यामुळे दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर अ गटातील या सामन्यात दोन्ही संघ जरा आरामात मैदानात उतरतील अशी अपेक्षा आहे. भारत आणि पाकिस्तानचे संघ आमनेसामने येतात तेव्हा खेळाडूंवर खूप दडपण असते.

### भारताचे पारडे जड

**भारतीय संघाचा अलिकडचा फॉर्म पाकिस्तानपेक्षा चांगला असल्याचे दिसून येते आहे. भारताची मजबूत फलंदाजी आणि गोलंदाजाची फळी त्यांना कोणताही सामना जिंकण्यास मदत करू शकते. भारत आणि पाकिस्तान दुबईमध्ये २८ वेळा एकमेकांसमोर आले आहेत. ज्यामध्ये पाकिस्तानने भारताचा १९ वेळा पराभव केला आहे. तर भारतीय संघाने पाकिस्तान विरुध्द फक्त ९ वेळा विजय मिळवला आहे. दुबईमध्ये भारताविरुद्ध पाकिस्तानचा पगडा भारी राहिला आहे.**

### चॅम्पियन्स ट्रॉफीत भारत तीन वेळा पराभूत

**चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारत आणि पाकिस्तान पाच वेळा आमनेसामने आले आहेत. या आयसीसी स्पर्धेतही पाकिस्तान संघ आकडेवारीत मजबूत आहे. पाकिस्तानने चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये भारतीय संघाला तीन वेळा पराभूत केले होते. भारतीय संघाला फक्त २ सामन्यात पाकिस्तानला हरवता आले आहे. पाकिस्तानचा संघ शेवटचा २०१७ च्या चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात एकमेकांसमोर आले होते. पाकिस्तानने हा सामना १८० धावांनी जिंकला होता.**

### संभाव्य प्रतिस्पर्धी संघ :

**भारत :** **रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल (उपकर्णधार), विराट कोहली, श्रेयस अय्यर, अक्षर पटेल, केएल राहुल (यष्टीरक्षक), हार्दिक पंड्या, रवींद्र जडेजा, हर्षित राणा, कुलदीप यादव आणि मोहम्मद शमी.**

**पाकिस्तान :** **मोहम्मद रिझवान (कर्णधार), बाबर आझम, फखर जमान, कामरान गुलाम, सौद शकील, तय्यब ताहिर, फहीम अशरफ, खुशदिल शाह, सलमान अली आघा, उस्मान खान, अबरार अहमद, हरिस रौफ, मोहम्मद हसनैन, नसीम शाह, शाहीन शाह आफ्रिदी.**

# मुंबई इंडियन्सचा थरारक विजय !

**बंगळुरू, दि. २२ :**

मुंबई इंडियन्स आणि आरसीबी यांच्यात डब्ल्यबपीएल मधील अटीतटीचा सामना खेळवला गेला. या सामन्यात अखेरीस मुंबई इंडियन्सने दणदणीत विजय मिळवला आहे. गतविजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूला महिला प्रीमियर लीगच्या तिसऱ्या सत्रात पहिल्या पराभवाला सामोरे जावे लागले आहे. स्पर्धेत दमदार सुरुवात करणाऱ्या बेंगळुरूला तिसऱ्या सामन्यात माजी चॅम्पियन मुंबई इंडियन्सकडून पराभव स्वीकारावा लागला.

बेंगळुरूच्या एम चिन्नास्वामी स्टेडियमवर झालेल्या या सामन्यात मुंबईने बेंगळुरूचा ४ गडी राखून पराभव केला. कर्णधार हरमनप्रीत कौरचे स्फोटक अर्धशतक आणि नेट सिव्हर–ब्रंटच्या झंझावाती खेळीने मुंबईच्या विजयात महत्त्वाची भूमिका बजावली, पण १६ वर्षीय जी कमलिनीने सर्वांच लक्ष वेधून घेतलं. जी कमालिनीने अखेरच्या षटकात विजयी चौकार लगावत संघाला शानदार विजय मिळवून दिला.



१६ वर्षीय जी कमालिनी ही यंदा जिंकलेल्या भारताच्या अंडर–१९ वर्ल्डकप संघाची सलामीवीर खेळाडू आहे. जिने संघाला चांगली सुरूवात करून देत यष्टीरक्षणाची जबाबदारी ही सांभाळली होती. आरसीबीविरूद्धच्या सामन्याच्या अखेरच्या षटकांमध्ये हरमनप्रीत कौर बाद झाल्यानंतर कमालिनीला मैदानावर उतरण्याची संधी मिळाली आणि तिने संघाला विजय मिळवून देत तिच्यावर सोपवलेली जबाबदारी चोख बजावली.

अठराव्या षटकात वेयरहमच्या गोलंदाजीवर हरमनप्रीत कौर आणि सजना सजीवन बाद झाल्या. यानंतर १२ चेंडूत मुंबईला विजयासाठी २२ धावांची गरज होती. दरम्यान अमनजोत कौरने पहिल्या चेंडूवर षटकार लगावला तर अखेरच्या चेंडूवरही अमनजोतने षटकार लगावत

**रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूचा ४ गडी राखून पराभव : कर्णधार हरमनप्रीतचे अर्धशतक**

सामना अजून अटीतटीच्या वळणावर आणून ठेवला. आता मुंबईला विजयासाठी ६ चेंडूत ६ धावांची गरज होती. पहिला चेंडू डॉट बॉल गेला. दुसऱ्या चेंडूवर २ धावा केल्या, तिसऱ्या चौथ्या चेंडूवर १–१ धाव केली. तर पाचव्या चेंडूवर १६ वर्षांच्या कमालिनीने चौकार लगावत संघाला ४ विकेट्सने शानदार विजय मिळवून दिला.

आरसीबीने दिलेल्या १६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना सुरूवातीलाच २ विकेट्स गमावले. पण नॅट स्किव्हर ब्रंटने ४२ धावांची वादळी खेळी करत संघाला सामन्यात कायम ठेवले. यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौरने उत्कृष्ट खेळी खेळत ३८ चेंडूत ८ चौकार आणि एका षटकारासह अर्धशतकी खेळी केली. यानंतर अमनजोत कौरने २ चौकार आणि २ षटकारांसह ३४ धावांची नाबाद खेळी केली आणि संघाच्या विजयात मोठी भूमिका बजावली. अमनजोत कौर आणि हरमनप्रीत कौर या दोघींनी ६२ धावांची शानदार भागीदारी रचली. यानंतर आलेल्या जी कमालिनीने ८ चेंडूत ११ धावांची खेळी केली.



**मडगाव : विजय मिळवलेला भाटीकर मॉडेलचा माध्यमिक विद्यालयाचा संघ शारीरिक शिक्षक राजेश चौगुले व मान्यवर.**

# भाटीकर माध्यमिक विद्यालयाचा २८४ धावांनी विजय

## स्व. दिलीप सरदेसाई करंड स्पर्धा

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २२ :** एसके मैदानावर स्व. दिलीप सरदेसाई १६ वर्षांखालील करंड स्पर्धेत भाटीकर मॉडेल माध्यमिक विद्यालयाने कुंकळ्ळी युनायटेड माध्यमिक विद्यालयावर २८४ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक जिंकून कुंकळ्ळी माध्यमिक विद्यालयाने प्रथम गोलंदाजी स्वीकारली भाटीकर माध्यमिक विद्यालयाने ४० ओवरीत ५ फलंदाज गमावून ३४० धावांचा डोंगर उभारला. त्यांच्या विनित कामत यांनी ९९ चेंडूत १६ चौकार व ४ षटकारांच्या जोरावर १५६ धावा केल्या. शमिक केणी यांनी ८ चौकारांच्या जोरावर ५३ चेंडूत ५३ धावा केल्या. आयुश गावकर यांनी ३४ धावा केल्या. कुंकळ्ळी युनायटेडच्या अनुष यांनी २ तर ऊर्फानने १ गोलंदाज बाद केले. कुंकळ्ळी युनायटेडचा डाव १७ ओवरीत ५६ धावांवर आटोपला. त्यांच्या शमिक केणी यांनी १९ धावा केल्या. भाटीकर मॉडेलच्या अनिष प्रभुगावकर ५ फलंदाज बाद केले तर अरीन आंगले व अयान बोरकर यांनी प्रत्येकी २ फलंदाज बाद केले. आयुष गावकर यांनी १ फलंदाज बाद केला.

# ऑस्ट्रेलियाचा इंग्लंडवर वनडेतील ऐतिहासिक विजय

## जोस इंग्लिसचे विक्रमी शतक | बेन डकेटच्या १६५ धावांच्या विक्रमी खेळी

**लाहोर, दि. २२ :**

ऑस्ट्रेलियाच्या संघाने वनडे क्रिकेटमध्ये ऐतिहासिक विजयाची नोंद केली आहे. ऑस्ट्रेलियाने इंग्लंडविरूद्ध चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सामन्यात ५ विकेट्सने दणदणीत विजय मिळवला आहे. इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वात मोठी धावसंख्या उभारली होती. पण हार मानेल तो ऑस्ट्रेलियाचा संघ कसला बडे खेळाडू संघाचा भाग नसतानाही ऑस्ट्रेलियाच्या नवख्या संघाने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील ऐतिहासिक विजय मिळवला आहे.

इंग्लंडने प्रथम फलंदाजी करताना ८ बाद ३५१ धावांचा डोंगर उभारला होता. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासात आजवर कोणत्याच संघाने इतकी मोठी धावसंख्या उभारली नव्हती. पण इंग्लंडने बेन डकेटच्या १६५ धावांच्या विक्रमी खेळीच्या जोरावर ही कामगिरी आपल्या नावे केली. पण ऑस्ट्रेलियाने मात्र ५ विकेट्सने विजय मिळवत आपल्या नावे नवा रेकॉर्ड केला आहे. ऑस्ट्रेलिया चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील सर्वात मोठ्या लक्ष्याचा यशस्वी पाठलाग करणारा पहिला संघ ठरला आहे.

ऑस्ट्रेलियाचे संघातील वरिष्ठ खेळाडू स्टीव्ह स्मिथ आणि ट्रॅव्हिस हेड स्वस्तात बाद झाले. पण नवा सलामीवीर मॅथ्यू शॉर्टने ६३ धावांची खेळी करत संघाच्या विजयाचा पाया रचला. यानंतर मार्नस लबुशेनने ४७ धावांची खेळी केली. तर संघाचा यष्टीरक्षक फलंदाज जोश इंग्लिसने वनडेमधील आपले पहिले शतक झळकावत मोठा विक्रमही आपल्या नावे केला. इंग्लिसने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या इतिहासातील संयुक्त जलद शतक झळकावले आहे. त्याने वीरेंद्र सेहवागच्या विक्रमाची बरोबरी केली. जोश इंग्लिसने ८६ चेंडूत ६ षटकार आणि ८ चौकारांसह १२० धावांची नाबाद खेळी केली. यानंतर ॲलेक्स कॅरीसह त्याने केलेली भागीदारी मॅचविनिंग ठरली.

ॲलेक्स कॅरीने ६३ तेंडूत ८ चौकारांसह ६९ धावांची खेळी केली तर मॅक्सवेलनेही येताच चौकार–षटकारांचा पाऊस पाडला. मॅक्सवेलने १५ चेंडूत २ षटकार आणि ४ चौकारांसह इंग्लिसला चांगली साथ दिली. इंग्लंडच्या गोलंदाजांची या नव्या ऑस्ट्रेलियाच्या फलंदाजांनी धुलाई केली. जोफ्रा आर्चरविरूद्ध १० षटकांत ८२ धावा केल्या ज्यात त्याने १ विकेट घेतली. याशिवाय जो रूट वगळता सर्व गोलंदाजांनी एकेक विकेट घेतली.



RNI No. GOAMAR/2013/49899 **दैनिक हेराल्ड** वर्ष १३, अंक १७१ **मालक:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., **प्रिंटर:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशक:** श्री. वॉल्टर लिगोरिओ डिसोझा, **प्रकाशन स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा, **छपाई स्थळ:** हेराल्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., प्लॉट क्र. एल – १३५, फेज २, वेर्णा औद्योगिक वसाहत, वेर्णा, सालसेत, गोवा. **एडिटर इन चीफ:** श्री. आर. एफ. फर्नांडिस, **संपादक:** श्री. दिनेश वासुदेव केळुस्कर (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी).

RNI No. GOAMAR/2013/49899 **Dainik Herald** Volume 13, Issue 171 **Owner:** Herald Publications Pvt. Ltd., **Printer:** Mr. Walter Ligorio D'Sousa, **Publisher:** Mr. Walter Ligorio D'Sousa,, **Published from:** Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa and **Printed from**: Herald Publications Pvt. Ltd., Plot No. L - 135, Phase II, Verna Industrial Estate, Verna, Salcete, Goa. **Editor in Chief** Mr. R. F. Fernandes, **Editor :** Mr. Dinesh Vasudev Keluskar (Responsible under P.R.B. Act), .